महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.- ३७४(२)/विद्युत/२०१९/१४-ब दिनांक:- ९ सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा- २०१९ च्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षित ०२ पदांच्या निकालाबाबत.....

संदर्भ :- जाहिरात क्र. ०५/२०१९, अधिसूचना क्र. १८/२०१९.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता , विद्युत, गट-ब, श्रेणी-२ या संवर्गाच्या १६ पदांकरीता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१९ च्या लेखी परीक्षेचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाकरीता आरक्षित ०२ पदांचा राखून ठेवण्यात आलेला निकाल दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत निकाल विविध मा . न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे , अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविलेल्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

ठिकाण:- मुंबई

उपसचिव (परीक्षा- २)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई